दैनिक
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

शुक्रवार
२४.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २८८
किंमत : ३ रू. पाने : ४

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955







# ओम नमः शिवाय! सनीला सोडा त्याला कशात गुंतवू नका

वाल्मिक कराड आणि पोलिसांची ऑडिओ क्लिप

बीड, (प्रतिनिधी) :- वाल्मिक कराड आणि बीडमधल पोलिस अधिकाऱ्यांची कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. ही ऑडिओ क्लिप बनावट नोटा प्रकरणात आरोपी असलेल्या सनी आठवले या आरोपीने स्वतःच्या इंस्टाग्रामवर पोस्ट केली आहे. या ऑडिओ क्लिपमधून वाल्मिक कराड बीड जिल्हा पोलीस दलात हस्तक्षेप कशा पद्धतीने होता हे यातून दाखवण्याचा प्रयत्न केलाआहे. संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणी आरोपी असलेला आरोपी वाल्मिक कराड आणि बीड पोलिसांची ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये कराड आणि पोलिसांमधील संवाद असल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे.

### ■ कोण आहेत पोलिस अधिकारी?

वाल्मिक कराड आणि बीड शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांचा ऑडिओ कॉल सध्या व्हायरल होतोय. या मोबाईल कॉलमध्ये गुन्हेगार सनी आठवले याच्यावर कारवाई करू नका. त्याला कशात गुंतवू नका. तो सध्या माझ्याकडे कार्यरत नसला तरीही तो माझ्या भावासारखा आहे. सध्या स्थानिक राजकारणामुळे योगेश आणि त्याचे जमत नाही म्हणून तो सध्या तिकडे गेला आहे, असा संवाद व्हायरल झाला आहे.

### ■ पोलिस अधिकारी काय म्हणाले?

सनी हा सराईत गुन्हेगार आहे. आणि त्याच्या संबंधी वाल्मीक कराड आणि पोलीस निरीक्षक शितकुमार बल्लाळ यांच्यात थेट संवाद झाला असल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान सदर क्लिप खोटी आहे. क्लिपमधील संवाद माझा नाही. सनी आठवले हा गुन्हेगार आहे. त्याचा भाऊ देखील गुन्हेगार आहे. सनी आठवले सध्या फरार आहे. यातील आवाज माझा नाही. याप्रकरणी मी गुन्हा दाखल करणार आहे, असे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ म्हणाले.

## पत्नीचा खून करून खुनाचा व्हिडीओ केला व्हायरल

# बीडच्या तरुणाचे पुण्यात कृत्य




पुणे, (वृत्तसेवा): - घरगुती वादातून कोर्टात स्टेनो म्हणून काम करणाऱ्या पतीने कात्रीने गळ्यावर वार करून पत्नीचा खून केल्याची घटना समोर आली आहे. खून केल्यानंतर या पतीने या खुनाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला आहे. ज्योती शिवदास गिते असे मृत महिलेचे नाव आहे. पुण्यातील खराडी परिसरातील ही धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी शिवदास तुकाराम गिते (३७) याला अटक केली आहे. शिवदास गिते हा मूळ बीडचा रहिवासी आहे. तो न्यायालयात स्टेनो म्हणून नोकरी करतो. सध्या शिवदास गीते पुण्यातील चंदननगर परिसरात तुळजाभवानीनगर येथे तो भाड्याने घर घेऊन राहत आहे. गिते पती-पत्नीमध्ये घरगुती कारणावरून भांडणे होत होती. बुधवारी पहाटे साडेचार वाजतादेखील याच कारणावरून त्यांच्यात जोरदार भांडण झाले. या वेळी रागाच्या भरात आरोपी शिवदास याने घरातील धारदार कात्रीने ज्योती हिच्या गळ्यावर वार केला. पतीने केलेल्या हल्लानंतर पत्नी जिवांच्या आकांताने ओरडली. त्यांचा आवाज ऐकून शेजारील लोक धावत घरी आले. पण तोपर्यंत ज्योती गिते या रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच चंदननगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तातडीने ज्योती यांना ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत फार उशीर झाला होता. रुग्णालयात जाता डॉक्टरांनी ज्योती यांना मृत घोषित केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 'माझी प्रॉपर्टी माझी पत्नी हडप करेल.', असा त्याला संशय होता. या संशयात त्याने (पान २ वर )

### स्वरक्षणासाठी हत्या केली-आरोपी

शिवदास गिते म्हणाला की, ज्योतीला मारण्याचा माझा हेतू नव्हता. मी तिला सांभाळले असते. माझ्यावर ज्योतीने ही वेळ आणली आहे. मी यापूर्वी कोणताच गुन्हा केलला नाही. तर गावातील एका कुटुंबानेही आपल्याला मारण्यासाठी प्रयत्न केला असा आरोपही गितेने व्हिडीओमध्ये केला आहे. माझ्या लेकराला मारण्याचाही हिने विचार केला असेल, म्हणून मला हे करावे लागले. मला हिला मारण्याची इच्छा नव्हती. मला मारण्याचा प्रयत्न हिच्याकडून होत होता. मी स्वरक्षणासाठी आणि माझ्या मुलाच्या भविष्यासाठी खून करावा लागला. माझ्या हत्येचे नियोजन करण्यासाठी ही बाहेर जात असल्याचे त्यांने व्हिडीओत म्हटले आहे.

# वाल्मीक कराडने जामीन अर्ज घेतला मागे

## मकोकाचा आरोप,प्रकृती बिघडल्याने दवाखान्यात



बीड, (प्रतिनिधी):-सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि मकोका प्रकरणात अटकेतील वाल्मीक कराडची रात्री त्याची तब्येत बिघडल्याने सरकारी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये हलविण्यात आले आहे. केज न्यायालयात त्याच्या जामीन अर्जावर आज सुनावणी होणार होती, पण कराडच्या वकीलाने ऐनवेळी हा अर्ज मागे घेतल्याने ही सुनावणी टळली. दरम्यान, वाल्मीक कराडने कोणत्या कारणामुळे जामीन अर्ज मागे घेतला? याचे कारण समोर आले नाही. वाल्मीक कराड याचा खंडणी प्रकरणातील जामीन अर्ज मागे घेण्यात आला आहे. वाल्मीकच्या वकिलांनी हा अर्ज मागे घेतला आहे. जामीन अर्जाच्या सुनावणीसाठी दोन तारखा झाल्यानंतर आज सुनावणी होणार होती. त्यामुळे कराडला जामीन की एमसीआर होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. मात्र वाल्मीकचे वकील अशोक कवडे यांनी जामीन अर्ज मागे घेतला आहे. दरम्यान वाल्मीक कराड याच्यावर मकोका अंतर्गत दाखल झालेल्या गुन्हा प्रकरणी काल न्यायालयात सुनावणी झाली, त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. कराडला न्यायालयीन कोठडी मिळाली असली तरी तपासात गरज पडल्यास त्याला पुन्हा पोलिस कोठडी मागण्याचा अधिकार एसआयटीने न्यायालयाकडे विनंती करून राखून ठेवला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव बीड शहर ठाण्यातून वाल्मीकला व्हीसीद्वारे न्यायालयासमोर हजर केले गेले होते. मस्साजोग खंडणी प्रकरणी वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मध्यरात्री कराडला अस्वस्त वाटू लागले. त्याच्या पोटात दुखायला लागल्याने कराडची ▶▶पान २ वर

# पं.स.समोर तीन दिवसांपासून उपोषण

## आंदोलकाची प्रकृती बिघडली; उपजिल्हा रुग्णालयात हलविले



परळी, (प्रतिनिधी):-१५ वा वित्त आयोग या अंतर्गत जी कामे झाली आहेत. त्या कामाची चौकशी करा गावा अंतर्गत पाणंद रस्ते व खडीकरणाच्या रस्त्याची चौकशी करावी या प्रमुख मागण्यांसाठी पं.स. समोर तीन दिवसांपासून उपोषण सुरु आहे. आंदोलक विजय बडे यांची प्रकृती बिघडली असुन त्यांना उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. रेवली येथील ग्रामपंचायत सदस्य विजय बडे यांनी विविध मागण्यांबाबत तीन दिवसांपासून उपोषण सुरु केलेले आहे. आज त्यांची प्रकृती बिघडली आहे. भ्रष्ट व कामचुकार सतत अपमान जनक वागणुक देणा-या ग्रामसेवकांना निलंबीत करण्यात यावे, १५ वा वित्त आयोग, ९०१०, २५४५ अंतर्गत सर्व कामांची चौकशी करुन संबंधीत अधिकारी वे ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, गाव अंतर्गत पांदन रस्त व खडीकरण रस्ते यांची चौकशी करुन संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावा., गट-ब व गट-क अंतर्गत झालेल्या रेवली पाटी ते. जिल्हा परिषद शाळा पर्यंत ▶▶पान २ वर

# दावोसमध्ये फडकला बीड जिल्ह्याचा झेंडा

## परळीपुत्राच्या उपस्थितीत ५०० कोटींचा करार, १२०० रोजगार



मुंबई, (वृत्तसेवा):- बीड जिल्हा गेल्या महिनाभरापासून गुहेगारी आणि गुंडगिरी व दहशतीच्या वृत्तांनी समोर आलाय. त्यातच, बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघात खंडणी, गुन्हेगारी, बंदुकधारी आणि गुत्तेदारीसारख्या घटना दैनंदिन असल्याचा आरोप विरोधी आमदारांकडून केला जात आहे. त्यामुळे, बीडचा बिहार झालाय का असे म्हणत बीड जिल्ह्याच नाव राज्यात झाकोळल्याचं पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे संतोष देशमुख हत्याकांडानंतर अनेक जिल्ह्यातील नागरिक आम्हाला ▶▶पान २ वर

### ■ काय म्हणाले भरत गिते?

टॉरल इंडिया कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गिते या उपक्रमाबद्दल बोलताना म्हणाले, "महाराष्ट्रातील एका छोट्या शहरातून आल्यामुळे, मी नेहमीच टियर भागांतील प्रचंड क्षमतेवर विश्वास ठेवला आहे आणि त्यांच्या प्रगतीसाठी संधी शोधण्याचा निर्धार केला आहे. २०२० मध्ये मी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटलो तेव्हा त्यांच्याशी या दृष्टिकोनाबद्दल चर्चा करण्याचे भाग्य मला मिळाले आणि आज त्यांच्याच दूरदृष्टीमुळे हे स्वप्न साकार होत असल्याचे पाहून ▶▶पान २ वर

# अजित पवार शरद पवारांच्या दालनात, बंद दाराआड चर्चा

पुणे, (वृत्तसेवा) :- गेल्या काही दिवसांपासून अजित पवार आणि शरद पवार एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. अलीकडेच शरद पवार आणि अजित पवार एका मंचावर दिसले होते. बारामती येथील कृषी प्रदर्शनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने पवार काका पुतणे एकत्र आले होते. यानंतर राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येतील, अशी चर्चा सुरू झाल्या. दरम्यान, त्याच मंच्यावर खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यातही संवाद झाला होती. दोघींच्या खुर्च्या एकमेकांशेजारी होत्या. दोन्ही पवार गट एकत्र येण्याच्या अनुषंगाने ती मोठी घडामोड मानली जात होती. यानंतर आता आजही अजित पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतली आहे. अजित पवारांनी घाई घाईने शरद पवारांच्या दालनात प्रवेश केला. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये बराच वेळ बंद दाराआड चर्चा झाली. या घडामोडीनंतर राजकीय वर्तुळात



चर्चांना उधाण आलं आहे. अजित पवार शरद पवारांच्या दालनात शिरल्याचा एक व्हिडीओही समोर आला आहे. ज्यात अजित पवार 'प्रेसिडेंट' असं लिहिल्याला खोलीत शिरताना दिसत आहे. ▶▶पान २ वर

# काँग्रेसने नाना पटोलेंचा राजीनामा स्वीकारला?

मुंबई, (वृत्तसेवा):-महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीला बहुमत मिळाले. तर महाविकासआघाडीचा सुफडासाफ झाला. महायुतीने २३० जागांवर विजय मिळाला. तर महाविकासआघाडीला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागेल. राज्यात फक्त १६ जागांवर काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. यामुळे काँग्रेसवर मोठी नामुष्की ओढावली. विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसचा दारुण पराभव ▶▶पान २ वर

# जि.प.शाळेसमोर कचऱ्याचा उकीरडा

## स्वच्छ बीड ही संकल्पना फक्त कागदावरच



बीड, (प्रतिनिधी) :- जिल्हा परिषद कार्यालयासह इतर सर्व कार्यालय स्वच्छ असावेत असा आदेश केंद्र आणि राज्य सरकारचा आहे. मात्र अनेक कार्यालयाच्या भोवती मोठ्या प्रमाणात कचरा असतो. घाणीचे साम्राज्य असते. गजानन नगर येथील जि.प. शाळा घाणीच्या विळख्यात सापडली. आजु बाजुला कचऱ्याचा उकीरडा जमा झाला आहे. नगर पालिका प्रशासनाची स्वच्छ बीड संकल्पना ही फक्त कागदावर असल्याचे दिसून येवू लागले. स्वच्छतेवर केंद्र आणि ▶▶पान २ वर



# आजचे बालक; उद्याचे पालक!



राज्याच्या विकासार्थ आवश्यक गुंतवणूक आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस येथे असताना जिल्ह्यांच्या विकासार्थ गुंतवणूक खेचण्याचा अधिकार आपल्या हाती राहावा यासाठी पालकमंत्र्यांची धुसफुस उफाळून यावी; हा विरोधाभास दुर्लक्ष करता येण्यासारखा नाही. ही पालकमंत्रीपदाची परंपरा जिल्ह्याजिल्ह्यांच्या विकासास मारक आणि पालकमंत्र्यांच्या स्व-विकासास किती तारक आहे हे 'लोकसत्ता'ने अलीकडेच दाखवून दिले. त्या वर्णनाची सत्यता इतक्या लवकर हे विकासोत्सुक सत्ताधीश दाखवून देतील असे वाटले नव्हते. पण तसे झाले खरे. याचा अर्थ या सत्ताधीशांस विकासाची आणि त्यातही या विकासाच्या गंगेचे नियंत्रण आपल्या हाती राहावे याची किती आस आहे याचा अंदाज चुकला. तो खरे तर फडणवीस यांचाही चुकला असावा, असे मानण्यास जागा आहे. कारण पालकमंत्रीपदाची पीडा संपवून ते बर्फाच्छादित आल्प्स पर्वतराजीतील दावोस येथे निवांतपणे गेले खरे! पण त्यांचे पाय तिकडे लागलेही नसतील तोच इकडे त्यांच्या राज्यात विकासोत्सुक मंत्रीगणांची अस्वस्थता बाहेर पडू लागली. त्यातही ज्या मंत्रिमहोदयांच्या वाट्यास एकाही जिल्ह्याचे पालकमंत्रीपद आलेले नाही ते अधिक अस्वस्थ, असे दिसून आले. विकासापेक्षा विकासाच्या पाळण्याची दोरी आपल्या हाती असावी असा या अस्वस्थांचा हेतू आहे असा याचा अर्थ काही जण काढतील. तो खरा नाही असे म्हणता येणार नाही. 'पालक' होणे म्हणजे पाल्याच्या पाळण्याची दोरी हाती असणे हे जितके व्यक्तीबाबत खरे म्हणता येते तितकेच ते पालकमंत्रीपदाबाबतही खरेच मानायला हवे. आपले पाल्य जसे इतर कोणी वाढवणे व्यक्तींस मंजूर नसते, तसेच आपल्या जिल्ह्याच्या विकासाचा पाळणा अन्य कोणी जोजावणे सत्ताधीशांस नामंजूर असते. हे सत्य लक्षात घेऊन जे झाले त्यावर भाष्य आवश्यक ठरते. विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सहकाऱ्यांची पालकत्वाची भूक अधिकाधिक कशी भागवता येईल, यासाठी केलेले नावीन्यपूर्ण उपाय लक्षात घेतल्यास या भाष्याची गरज लक्षात यावी. इतके दिवस पालकमंत्रीपदाचे भाग्य एका मंत्र्याच्याच नशिबात असे. फडणवीस यांनी ही अडचण लक्षात घेऊन आपल्या मंत्री सहकाऱ्यांचे नशीब बदलले. त्यामुळे महाराष्ट्रात यापुढे एका पालकमंत्र्याच्या जोडीला सह-पालकमंत्री असतील. अधिक पालक म्हणजे अधिक विकास, असाच हा विचार असणार. मंत्रिमंडळात ज्याप्रमाणे कॅबिनेट मंत्री, त्याखालोखाल राज्यमंत्री, त्याखालोखाल उपमंत्री इत्यादी नेमण्याची सुविधा असते त्याप्रमाणे पालकमंत्रीपदांबाबतही केले जावे. एक पालकमंत्री, त्याची विकासाची भूक शांत करण्यात साहाय्यभूत ठरेल असा सह-पालकमंत्री आणि या सह-पालकमंत्र्यांच्या विकासप्रेरणा भागवण्यास उप-पालकमंत्री अशी त्रिस्तरीय रचना याबाबतही व्हावी. महाराष्ट्र त्या दिशेने पहिले पाऊल टाकू शकतो. नाही तरी या प्रगतिशील राज्याकडे केंद्रीय स्तरावर राबवल्या जाणाऱ्या अनेक योजनांचे जनकत्व आलेलेच आहे. (पाहा : रोहयो, महिला आरक्षण इत्यादी) त्याप्रमाणे ही पालकमंत्री-सहपालकमंत्री- उपपालकमंत्री रचना प्रत्यक्षात आणून महाराष्ट्राने इतरांसाठी पथदर्शक ठरायला हरकत नाही. तसेही सत्ता विकेंद्रीकरण आणि त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य व्यवस्था विकासासाठी आवश्यक मानली जाते. तशीच ही पालकमंत्री रचनाही त्रिस्तरीय असणे योग्य. तसे करणे तार्किकही ठरावे. याचे कारण पालकमंत्री ही संकल्पना मुळात जन्मास आली महाराष्ट्रात. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या काळात या पालकमंत्रीपदाचा उगम. हे नाईक विदर्भातले. विद्यमान मुख्यमंत्री फडणवीस हेही विदर्भातलेच. त्यामुळे पालकमंत्रीपदाची एका वैदर्भीय मुख्यमंत्र्यांनी निर्माण केलेली परंपरा दुसऱ्या विदर्भप्रांतीय मुख्यमंत्र्यांनी अधिक बळकट करणे इष्ट. यात आणखीही एक करता येईल. जे प्रत्यक्षात मंत्री नाहीत त्यांच्याकडे उपपालकमंत्रीपद द्यावे. त्यामुळे आगामी काळातील मंत्री घडवता येतील. आणि दुसरे असे की अलीकडे केवळ स्वबळावर सत्ता येणे पुरेसे समाधानकारक नसते. अशी सत्ता आली की उरल्या-सुरल्या विरोधी पक्षांतील उरल्या-सुरल्या आमदार आदी नेत्यांस आपल्यात घ्यावे लागते. यामुळे गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळते. याखेरीज याचे अन्य काही फायदेही आहेत. जसे की विरोधी पक्ष रिकामे करून टाकल्याने त्या पक्षांस नवे नेते निर्माण करण्याची निकड भासते आणि त्यातून उद्यासाठी नवनव्या नेत्यांचा शोध घेता येतो. परत विरोधी पक्षांनी एकदा का एखादा नेता घडवला रे घडवला की त्यास आपल्यात घेण्याची सोय सत्ताधारी पक्षांस आहेच. म्हणजे ही नेते निर्मितीची प्रक्रिया अव्याहत सुरू राहते. पैसा ज्याप्रमाणे फिरता हवा त्याप्रमाणे हे नेतेही फिरते असणे हे त्यांच्या आणि प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेस हितकारक असते. आणि दुसरे असे की विरोधी पक्षांतून असे नवनवे नेते घेण्याची सोय असल्यामुळे आपल्या पक्षातील कालबाह्य, ज्येष्ठ, आडमुठ्या अशा निष्ठावानांस मार्गदर्शक मंडळ वा सतरंजी मंडळांत वर्ग करण्याची सोय सत्ताधारी पक्षांस मिळते. याचा अर्थ असा की या पद्धतीचा अवलंब केल्याने विरोधी पक्ष आणि सत्ताधारी या दोन परस्परविरोधी गटांत 'भाकरी फिरती राहते'. ही बाब फार महत्त्वाची. कारण भाकरी फिरती राहिली की ती करपत नाही. त्याचबरोबर या पद्धतीत नवनवे नेते महाराष्ट्रास गवसणे अधिक सुलभ होईल, ही आणखी एक सोय. गेली कित्येक दशके महाराष्ट्रास नवे, तरणेबांड नेतृत्व मिळालेले नाही. जे आहेत ते वंशपरंपरेने पुढे आलेले. अशी काही परंपरा नसलेले फडणवीस यांच्यासारखे काही मोजकेच. त्यामुळे ही पालकमंत्र्यांची त्रिस्तरीय रचना अमलात आल्यास महाराष्ट्री नेतृत्वाचे पीक भरघोस लागेल. ज्याप्रमाणे झाड चांगले वाढण्यासाठी त्याची कापणी आवश्यक असते त्याचप्रमाणे नेतृत्व अधिकाधिक बहरावे यासाठी परंपरेची कापणी गरजेची असते. फडणवीस यांनी सह-पालकमंत्री योजून जुन्या परंपरेची छाटणी करून नव्या परंपरेची पेरणी केलेली आहेच. ती अधिक सक्षम करावी आणि तीस संस्थात्मक स्वरूप द्यावे. बहुधा या नव्या पालकमंत्र्यास एकदा का विकासाची भरघोस फळे लागली की फडणवीस यांस आणखी एक पाऊल पुढे टाकता येईल. म्हणजे आता केवळ ते सह-पालकमंत्री नेमून थांबले आहेत. उद्या जिल्ह्याजिल्ह्यांच्या वेलीस लागलेली विकासफळे पाहिली की ते सह-पालकमंत्री या पदांबरोबर उप-पालकमंत्रीही नेमण्याचा विचार खचितच करतील. सध्या फक्त रायगड आणि नाशिक या जिल्ह्यांतील पालकमंत्री नेमणुकांनाच फडणवीस यांनी स्थगिती दिलेली आहे. ती अन्य नेमणुकांनाही द्यावी. सध्या राज्यात तीन पक्षांचे सरकार आहे. म्हणजे विकासाची शक्यता तीनपट. एकापेक्षा तीन अधिक असल्याने एका पक्षापेक्षा तिघांचे सरकार कधीही बरे. शक्य झाल्यास ते चौघांचे वा पाच पक्षांचे करावे. या सरकारात राष्ट्रवादी आणि शिवसेना हे सहभागी आहेत. काँग्रेसचा सहभाग नाही आणि राज ठाकरे यांचा सहभाग असून नसल्यासारखा. किंवा नसून असल्यासारखा असेही म्हणता येईल. त्यामुळे ही पालकमंत्रीपदाची त्रिस्तरीय रचना प्रत्यक्षात आणल्यास राज्याच्या विकासात काँग्रेस आणि मनसे यांनाही सहभागी करून घेता येईल. अशा तऱ्हेने समस्त राजकीय पक्ष सत्ताधारी झाले की विकासास कोणीच विरोध करणार नाही. या सर्व राजकीय पक्षांच्या तरुण आणि बाल आघाड्याही आहेत. जसे की युवासेना. अशा सर्वपक्षीय तरुण आघाड्यांसही विद्यामान सत्ताधीशांनी आपल्याकडे ओढून घ्यावे आणि पालकमंत्र्यांसमवेत उद्याचे नेतृत्व घडवण्यासाठी बालकमंत्रीही नेमावेत. आजचे बालक हे उद्याचे पालक. त्या धर्तीवर आजचे बालकमंत्री राज्याचे उद्याचे पालकमंत्री असतील.

# परळी तालुक्यातील भरत गीते यांच्या टॉरल इंडिया कंपनीचा दावोस मध्ये महाराष्ट्र शासनाशी करार

## मंत्री धनंजय मुंडे यांनी भरत गीते यांचे समस्त परळीकर यांच्या वतीने केले अभिनंदन आणि कौतुक



मुंबई (प्रतिनिधी) - परळी तालुक्यातील नंदागौळ या छोट्याशा गावात जन्मलेले परळीचे भूमिपुत्र भरत गीते यांच्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने दाऊशे ते सुरू असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम मध्ये महाराष्ट्र शासनाची दोन प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्याबाबत सामंजस्य करार केला असून, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी याबाबत पोस्ट शेअर करत भरत गीते व त्यांच्या टीमचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे. भरत गीते यांच्या टरल इंडिया या कंपनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुपा व अहिल्यानगर या ठिकाणी अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग सोल्युशन निर्माण करून ते जगभरात निर्यात करता येईल अशा पद्धतीचे प्रकल्प उभारण्यात येणार असून यासाठी ५०० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक केली जाणार असून १२०० पेक्षा अधिक रोजगारांची याद्वारे निर्मिती होणार आहे. दरम्यान या ना त्याकारणाने मागील काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत असलेल्या परळी तालुक्यातील नंदागौळ या छोट्याशा गावचे सुपुत्र असलेले भरत गीते यांनी आंतरराष्ट्रीय दर्जावर आपल्या टरल इंडिया या कंपनीची छापून ठेवली असून त्या कंपनीचे महाराष्ट्र मध्ये दोन प्रकल्प उभारत रोजगार निर्मितीत तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देत असल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अभिमान आणि आनंदाचा हा क्षण असल्याचे म्हणत भरत गीते यांचे कौतुक केले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ही संधी उपलब्ध करून समस्त परळीकरांना हा बहुमान प्राप्त करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उद्योग मंत्री उदय सामंत यांचे देखील धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त करत भरत गीते व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.

# शिवसेनेचं ऑपरेशन शिवधनुष्य अन् टायगर

## ठाकरेंना दे धक्का, मंत्री उदय सामंतांचा गौप्यस्फोट



मुंबई, (वृत्तसेवा):- शिवसेनेतील फुटीनंतर राज्यात महायुती सरकार स्थापन झालं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेतील ४० पेक्षा जास्त आमदारांनी ठाकरेंची साथ सोडल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, विधानसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेला फटका बसेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेपेक्षा शिंदेंच्या शिवसेनेला भरगोस यश मिळालं. त्यातच, आता ठाकरेंकडील आमदार व खासदार फुटणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असून शिवसेनेचं ऑपरेशन शिवधनुष्य व ऑपरेशन टायगर हाती घेण्यात आलं आहे. आता, याबाबत शिवसेनेतील वरिष्ठ नेते आणि मंत्री उदय सामंत यांनीही दुजोरा दिला आहे. महाराष्ट्रात पुन्हा ऑपरेशन धनुष्यबाणाची चर्चा सुरू झाली असून शिवसेना ठाकरे गटाच्या खासदारांवर शिंदेंच्या शिवसेनेची नजर असल्याचे उघडकीस आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या मुंबई दौऱ्यात या मिशनचं पुढील प्लॅनिंग होणार असल्याची माहिती आहे. ऑपरेशन टायगरला उद्या रत्नागिरीमधून सुरुवात होत आहे. पण आधीच ते ऑपरेशन सुरू झाले असून अनेकांनी शिवसेनेत प्रवेश केले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील १० माजी आमदार प्रवेश करतील, काही माजी आमदार हे पश्चिम महाराष्ट्रातले आहेत. तर, काही लोक असे आहेत जे आम्ही येतो असे म्हणतात, पण त्यांना आम्ही घेणार नाही, असेही उदय सामंत यांनी म्हटले. ऑपरेशन शिवधनुष्यबाबत मंत्री उदय सामंत यांनी एबीपी माझावर कबुलीच दिल्याचं पाहायला मिळालं. सध्या तांत्रिक अडचण येत असल्यानं हे ऑपरेशन होल्डवर असल्याची माहिती आहे. हो आमचं ऑपरेशन शिवधनुष्य आणि ऑपरेशन टायगर सुरु आहे. खासदारांचा पक्षप्रवेश होणार आहे, तांत्रिक बाबींच्याही अडचण येत आहेत. त्यामुळं सध्या वेळ आहे, पहिले पक्षाचे पदाधिकारी येतील, मग खासदार येतील, असा गौप्यस्फोटच उदय सामंत यांनी एबीपी माझाशी बोलताना केला आहे.

# एकात्मिक पीक व्यस्थापनाद्वारे हरभरा उत्पादनात वाढ शक्य-कृष्णा कर्डिले

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई माध्यमातुन निक्रा प्रकल्प अंतर्गत मौजे राजेवाडी येथे हरभरा प्रक्षेत्र दिनाचे आयोजन केले होते. यावेळी राजेवाडी गावाचे उपसरपंच रणजित गडकर, ग्राम हवामान आपत्ती व्यवस्थापन समिती अध्यक्ष भास्कर काशीद, कृविके चे पिकविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले, पिक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शन करताना कर्डिले यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून निक्रा प्रकल्पा अंतर्गत मागील ३ वर्षात झालेल्या बांधबंधिस्ती, फेरो सिमेंट पाणी साठवणूक हौद, बोर पुनर्भरण, माती परीक्षणानुसार अन्नद्रव्य व्यवस्थापन, सुधारित व हवामान बदलास अनुकूल नवीन वाणांचा लागवडीसाठी वापर, हवामान आधारीत कृषी सल्ला सेवा पत्रिका वापर, विविध आंतरपीक पद्धती, सोयाबीन बिजोत्पादन, रब्बी ज्वारी, हरभरा, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन,सेंद्रिय शेतीसाठी गांडूळखत निर्मिती, शेळीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना शेळ्याकरिता खनिज चाटण विटाचा वापर, जनावरांना पोष्टीक चाऱ्यासाठी फुले गुणवंत चारापिकांचे प्रात्यक्षिके, पशू आरोग्य शिबीर, अवजारे सेवा केंद्र इत्यादी घेतलेल्या प्रात्यक्षिकांसह राजेवाडी गावामध्ये झालेल्या शेती कामाची माहिती दिली. एकूण ३४ शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर रब्बी हंगामामध्ये हरभरा पीक प्रात्यक्षिके घेण्यात आल्याची माहिती दिली. यानंतर गावातील शेतकरी श्रीकिशन सुरवसे यांच्या हरभरा पीक प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर शास्त्रज्ञांनी भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निक्रा प्रकल्पाचे वरिष्ठ सह- संशोधक बालाजी बोबडे यांनी केले तर प्रतिक आजने यांनी आभार मानले.

पान १ वरून

### वाल्मिक कराडने...

सोनोग्राफी करण्यात आली. डॉक्टरांनी त्याची मधुमेह व रक्तदाबाची तपासणी केली. वाल्मीकचा त्रास वाढल्याने त्याला १२ च्या सुमारास बीडच्या कारागृहातून बाहेर नेत सरकारी रुग्णालयात भरती करण्यात आले. कराडची बुधवारी वैद्यकीय तपासणी केली गेली. त्याला सर्दी, ताप व खोकला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी काही गोळ्या दिल्या. त्याला स्लीप ॲप्निया नावाचा आजार आहे. म्हणून न्यायालयीन कोठडीत ऑटो सी-पॅप मशीन वापरण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती त्याने वकिलामार्फत केली होती, ती न्यायालयाने मान्य केली. कराडला न्यायालयीन कोठडी मिळाल्याने तो जामिनासाठी अर्ज करण्यास पात्र झाला आहे. मात्र मकोकामुळे त्याच्या जामिनाची वाट बिकट आहे. त्यामुळे त्याच्या वकिलांकडून आता उच्च न्यायालयात मकोकाला आव्हान दिले जाणार आहे.

### पत्नीचा खून करून...

ज्योतीची हत्या केली. पुढील तपास खराडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण करत आहेत. ज्योती गीतेचा मृतदेह तिच्या नातेवाईकांकडे देण्यात आला असून तो तिच्या मूळ गावी पाठवण्यात आला आहे.

### दावोसमध्ये फडकला...

आमच्या जिल्ह्याचा बीड करायचा नाही, असंही म्हणतात. मात्र, बीडमधील काही उदाहरणांनी बीडचं नाव जगात सुवर्णअक्षरांनी कोरलंय, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. त्यामध्ये, टॉरल इंडिया या जागतिक कंपनीचे एम.डी. भरत गिते. टॉरल इंडिया ही पुण्यात स्थित एक जागतिक दर्जाची अत्याधुनिक अल्युमिनियम फाउंड्री आहे, जी विविध उद्योगांना अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग सोल्यूशन्स उपलब्ध करून देण्याचं काम करते. नुकतेच या कंपनीने दावोसमध्ये राज्य सरकारसोबत ५०० कोटी रुपयांचा करार केला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी झाल्या. स्वीत्झरलँड येथील दावोस येथे बीड जिल्ह्याच्या परळीचे मुळचे रहिवासी असलेले सध्या जर्मनी व पुणे येथे कार्यरत असलेले टॉरल इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गिते यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत टौरल दरम्यान मोठ्या गुंतवणुकीच्या करारावर स्वाक्षरी केली. महाराष्ट्र सरकार आणि टौरल इंडियामध्ये एकूण ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार झाला त्यातून १२०० जणांना रोजगार मिळू शकेल. टौरल इंडिया लिमिटेड ही स्टील आणि धातू क्षेत्रात काम करणारी जर्मन कंपनी आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत टौरल इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गिते यांचे आभार मानले. त्यामुळे, गेल्या महिनाभरापासून बदनाम झालेल्या बीडमधील परळीचं नाव चांगल्या कारणाने पुढे आलंय. भरत गिते यांनी आपल्या उत्कृष्ट उद्योजकीय कार्यातून बीडचं नाव उद्योग क्षेत्रात झळवलंय, असेच म्हणावे लागेल. ✻ सुपा गावात १२०० हून अधिक रोजगार : दरम्यान, महाराष्ट्रातील अहिल्या नगरमधील सुपा येथे उत्पादन कार्याचा विस्तार करण्यासाठी टॉरल इंडियाने दावोसमध्ये महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करार केला आहे. या विस्तारामुळे उत्पादनामध्ये वाढ होणार असून या भागात १२०० हून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. हा सामंजस्य करार माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२५ मध्ये करण्यात आला. ✻ सरकारसोबत ऐतिहासिक करार : जागतिक स्तरावरील अग्रगण्य इंटिग्रेटेड अल्युमिनियम फाउंड्री असलेल्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने सुपा (अहिल्या नगर, महाराष्ट्र) येथील १२,००,००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा सामंजस्य करार वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान दावोस येथील महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये झाला, ज्यामध्ये देवेंद्र फडणवीस, उदय सामंत आणि अन्य वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते. या सुविधेमुळे १२०० हून अधिक स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, या भागातील समुदायाच्या प्रगतीसाठी एक परिवर्तनकारी पाऊल उचलले गेले आहे.

### काय म्हणाले...

मला अभिमान वाटतो, असे गिते यांनी म्हटलं. या भागात जागतिक दर्जाचे कौशल्य आणि तंत्रज्ञान विकसित करून, जागतिक दर्जाची पायाभूत संस्कृती प्रस्थापित करण्याचा आम्हाला विश्वास आहे. स्थानिक क्षेत्रामध्ये जागतिक कौशल्य आणि नवकल्पनांचे संयोजन करून, सुपाला उत्पादनाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे आणि या भागाच्या विकासासाठी नवीन मानके स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहोत.'', असेही गिते यांनी या करारावेळी म्हटलं.

### पं.स.समोर...

झालेल्या डांबरीकरण रस्त्याची चौकशी करून संबधीत अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करुण कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, संबंधित अधिकाऱ्यां तात्काळ निलंबीत करण्यात यावे आदी मागण्या करण्यात आलेल्या आहेत. तीन दिवसापासून परळी पंचायत समिती कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू आहे. आंदोलक विजय बडे यांची प्रकृती बिघडली असुन त्यांना उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी अशी मागणी होत आहे.

### जि.प.शाळेसमोर...

राज्य सरकार दरवर्षी कोट्यावधी रूपये खर्च करत आहे. एवढा खर्च करून देखिल शासकीय कार्यालय आणि कार्यालयाचा परिसर स्वच्छ दिसत नाही. जिल्हा परिषद कार्यालयाच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत संबधित विभागाला धडे दिले जातात. शहरातील गजानन नगर भागातील जि.प. शाळेच्या आवारात घाणीचे साम्राज्य आहे. रस्त्याच्या समोर कचऱ्याचा ढिग पडला. गेल्या दोन महिन्यापासून हा कचरा उचलला नसल्याचे दिसूनयेवू लागले. नगर पालिका प्रशासन नुसतेच स्वच्छतेबाबत आव आणत असते. स्वच्छ बीड ही संकल्पना फक्त कागदावर दिसून येवू लागली.

### काँग्रेसने नाना...

झाला. यानंतर गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसच्या गोटात मोठ्या हालचाली सुरु आहेत. त्यातच आता लवकरच महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानतंर नाना पटोलेंनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याची चर्चा रंगली होती. नाना पटोले हे काही दिवसांपूर्वी दिल्लीला रवाना झाले होते. त्यांनी २४ नोव्हेंबरला काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेत काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा सुपूर्द केल्याचे बोललं जात होतं. त्यानंतर नाना पटोले यांना काँग्रेस हायकमांडकडून वेट अँड वॉचच्या भूमिकेत राहण्यास सांगितले होते. यानंतर आता महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बदलाचे मोठे संकेत सध्या मिळत आहेत. काँग्रेसचा नवा प्रदेशाध्यक्ष कोण असणार याबद्दल अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. त्यातच आता काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदासाठी दोन नावांमध्ये रस्सीखेच सुरु आहे. काँग्रेस हायकमांडकडून सध्या अमित देशमुख आणि सतेज पाटील या दोन नेत्यांच्या नावाचा प्रदेशाध्यक्षपदासाठी विचार सुरु आहे. अमित देशमुख आणि सतेज पाटील अशा दोन नावांची चर्चा असली तरी सतेज पाटील यांच्या गळ्यात प्रदेशाध्यक्षपदाची माळ पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबद्दल येत्या सोमवारपर्यंत अधिकृत घोषणा होऊ शकते, असे बोललं जात आहे. मात्र अद्याप याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठ्या पराभव पत्करावा लागला. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभव झाला. या निवडणुकीत पृथ्वीराज चव्हाण, यशोमती ठाकूर, बाळासाहेब थोरात, माणिकराव ठाकरे हे नेते पराभूत झाले होते. नाना पटोले यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारत राजीनामा दिला होता. आता हा राजीनामा काँग्रेस हायकमांडकडून स्वीकारण्यात आल्याचे बोललं जात आहे.

### घाईघाईनं अजित पवार...

घाईघाईत त्यांनी पीएसोबत केलेला संवाद देखील समोर आला आहे. संबंधित व्हिडीओत अजित पवार घाईघाईत चालत येताना दिसत आहेत. आल्यानंतर ते 'कुठे बसायचं रे' असं पीएला विचारताना दिसत आहेत. यावर 'साहेब इकडे आत बसलेत' असं पीएने सांगितल्यावर अजित पवार प्रेसिडेंट बोर्ड लावलेल्या दरवाज्यातूनआतमध्ये शिरले. यानंतर याच दालनात दोघांमध्ये जवळपास अर्धा तास चर्चा झाली. खरं तर, आज वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची सर्वसाधारण सभा आहे. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने शरद पवार आणि अजित पवार एकत्रित आल्याचं बोललं जातंय.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# आमदाराने गेल्या पाच वर्षात मुस्लिम बहुल वार्डासाठी काय केले ? : नितीन जायभाये

## आ.क्षीरसागर यांना बीड शहर बचाव मंचाने मागितला गेल्या पाच वर्षाचा आढावा

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षापासून सातत्याने मी व आमचे सहकारी सर्वच मुस्लिम बहुल वॉर्डांमध्ये दौरे करत आहोत. या मुस्लिम बहुल वार्डांमध्ये कुठेही विकासाची कामे होत असताना दिसत नाहीत. सुव्यवस्थित नाल्या नियोजनाच्या व साफसफाई अभावी प्रचंड घाणीचे साम्राज्य कायम या सर्व भागांमध्ये पसरलेले दिसते. यामुळे मुस्लिम समाजातील लहान मुले, महिला व सर्व नागरिक सतत साथीच्या रोगांचे शिकार ठरत आहेत. दुर्गंधी व घाणीच्या साम्राज्यात वावर हा आयुष्यभर त्यांच्या पाचीला पुंजलेला आहे. या सर्व कारभाराला व परिस्थितीला जिम्मेदार कोण.? मतं घेऊन आमदार होताना, आमदारकी भोगताना फार आनंद वाटतो पण ज्यांची मते घेतली त्यांच्या भागांचा विकास कोण करणार.? त्यांच्या मूलभूत सोयीसुविधीचं काय? पाच वर्षात कधीतरी नगरपालिकेत एकदा तासभर दौऱ्याचं नाटक करून चार कागद चाळून आढावा मागितल्याने विकास होत नसतो. त्यासाठी सातत्याने जाणिवेने विकास कामांसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा करणे, मिळालेल्या निधीमध्ये काम करताना टक्केवारी न मागणे,निधी आणून योग्य पद्धतीने त्याचा वापर करून लोकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे,भ्रष्टाचार मुक्त विकासाची कामे करणे, कामे अपूर्ण स्थितीत न सोडणे, कामांच्या दर्जा विषयी जागरूक असणे, वार्डा-वार्डा मध्ये फिरून लोकांच्या अडचणी सातत्याने जाणून घेणे, त्यावर सतत उपायोजना करत राहणे अशा अनेक बाबींचा त्यामध्ये समावेश असतो. दुर्दैवाने आपल्याकडे निवडून दिलेले लोकप्रतिनिधी असं काही काम करताना कधीच दिसत नाहीत. एकाच घराण्याकडे सातत्याने अनेक वर्षापासून सत्ता असल्याकारणाने त्यांनाही लोकांच्या अडीअडचणी गरजा समस्या प्रश्न याविषयी जाणीव व गांभीर्य राहिलेले नाही. सत्ता म्हणजे आपलीच मक्तेदारी हा अविर्भाव त्यांच्यात निर्माण झाला आहे. ही मानसिकता बदलल्याशिवाय बीड शहराचा विकास अशक्य आहे. बीड शहर बचाव मंचाने आधी गेलेल्या पाच वर्षात केलेल्या कामांचा आढावा द्या व नंतर शहरात फिरा असे निर्देश दिले आहेत.

**मुस्लिम बहुल वार्डांमध्ये प्रचंड घाणीचे साम्राज्य साफसफाई च्या नावाने सातत्याने दुर्लक्ष व बोंब. मुस्लिम वार्डांमध्ये जाणीवपूर्वक क्षीरसागरांचे दुर्लक्षएक रुपयाचे ही गेल्या पाच वर्षात कुठेही काम नाही. फक्त निवडणूक आली की मतांसाठी मुस्लिम बांधवांची आठवण येते. विकासाची कुठलीही तळमळ नसल्याने सर्व नगरसेवक सोडून गेले मुस्लिम बहुल भागांमध्ये मानव जीवनस्तर कमालीचा ढासळला आहे ही आमदारांचीच कृपा. आमदार कृपेने शहरातील विस्तारित मुस्लिम भागांमध्ये सगळीकडे लाईटच्या समस्या,लोक अंधारात आहेत. नुसती उद्घाटन- नुसती नारळ एकही काम केले नाही. एखाद-दुसरे केलेले काम तेही अपूर्णच. काही मुस्लिम भागांमध्ये अजून नाल्या व रस्तेच झालेले नाहीत.**

# रासेयो विशेष शिबीरात आरोग्य तपासणीला उत्स्फूर्त प्रतिसाद





**सफेपूर । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक शिबीरात आरोग्य तपासणी उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमासाठी स्त्री व कुटीर रुग्णालय, नेकनूर येथील डॉ. मुख्तार शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय टीममध्ये तेजस ओव्हाळ, श्री. हजारे, श्री. पांचाळ, श्री. मिरगणे इत्यादींची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी शिबीरार्थींना मार्गदर्शन करताना डॉ. मुख्तार शेख म्हणाले की, या शिबीरात रक्तगट, हिमोग्लोबिन, रक्तदाब, डायबीटीस तपासणी व अनेमिया तपासणी करून औषधे वाटप करण्यात येणार आहे. आपलं आरोग्य जोपासले पाहिजेत. आरोग्य चांगले तर आयुष्य आनंदमय असेल करिता अशा शिबीराचे आयोजन होणे आवश्यक आहे. या शिबीराचा शिबीरार्थी व गावकऱ्यांनी लाभ घ्यावा. आपणास समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आम्ही आमचे कर्तव्य पार पाडत असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. टीमने राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक व गावकऱ्यांची रक्ताचे नमूने घेतले. तसेच गावकऱ्यांचे मधूमेह व बीपी तपासणी करून वृध्दांना औषधीचे वाटप करण्यात आले. आरोग्य शिबीराचे नियोजन प्रा. मुजावर एस. टी., प्रा. डॉ. जाधव जे. के. रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अंकुश काळे व डॉ. राजेश आरदवाड यांनी केले. या आरोग्य तपासणीला ४५ स्वयंसेवकांनी व २० गावकऱ्यांनी प्रतिसाद नोंदविला.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना गुंतवणूकदार जागरूकतेचे धडे

## विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी महाविद्यालयाने रावबला उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**



विद्यार्थी सुशिक्षीत होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही. आर्थिक साक्षरता होणे काळाची अत्यंत गरज आहे. आपला पैसा कोठे आणि कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे. आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर तो विद्यार्थी भविष्यात केव्हाच आर्थिक अडचणीत येवू नये यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) कडून एक दिवशीय गुंतवणूकदार जागरूकता कार्यशाळा घेण्यात आली यावेळी सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे धडे दिले.

अलीकडे तरुण वर्गामध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव दिसून येतो. तरुणांचा काळ दिवसेंदिवस चैनी वस्तू, मौजमजा, बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे वळत चालला आहेत. तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक होते. यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थी दशेमध्ये योग्य ते आर्थिक नियोजन केले तर भविष्यातील येणारे आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात. यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला. आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले. तसेच कॅपिटल मार्केट काय असते?, म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे, एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ, गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबी च्या सारथीचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारी च्या सूचना दिल्या. आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. आदित्य पॉलिटेक्निक कॉलेजचे विभागप्रमुख श्रीकांत शहाणे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. आभार तांबे यांनी मानले.

### विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा

**आदित्य शिक्षण संस्थेत आलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देताना आम्ही कोठेच कमी पडत नाहीत. पुस्तकी ज्ञान मिळवून आमचे विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात मोठं नाव कमावत आहेत. मात्र येथून बाहेर पडल्यानंतर ते आर्थिक साक्षर होऊन बाहेर पडतावेत. जिवन जगतांना त्यांना आर्थिक नियोजन करता यावे यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देणारा उपक्रम राबवला. -संचालक डॉ. आदित्य सारडा**


# मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्काराचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख व खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते २७ जानेवारीला होणार वितरण

## आ.प्रकाश सोळंके, ओमप्रकाश शेटे, बाबुराव पोटभरे, भाई मोहन गुंड, भागवत तावरे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार

**माजलगाव । प्रतिनिधी**


आ.भाई डॉ.बाबासाहेब देशमुख


मा.खा.बजरंगबप्पा सोनवणे


मा.आ.प्रकाशदादा सोळंके


मा.ओमप्रकाश शेटे


मा.बाबुराव पोटभरे


मा.भाई मोहन गुंड


मा.भागवत तावरे

माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने दि २७ जानेवारी सोमवार रोजी होणाऱ्या मूकनायक आणि माजलगाव भूषण पुरस्कार सन्मान सोहळ्याला शेतकरी कामगार पक्षाचे माजी मंत्री स्व लोकनेते गणपतराव देशमुख यांचे नातु पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड लोकसभेचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची उपस्थिती लाभणार आहे,अशी माहिती संयोजक ज्योतिराम पांढरपोटे यांनी दिली. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळा, सोमवार दि २७ जानेवारी २०२५ रोजी शहरातील मॉ.वैष्णवी मंगल कार्यालयात सकाळी ११:०० वाजता रंगणार आहे. मुकनायक पुरस्कारासाठी दै राज्य लोकतंत्रचे बीड/पुणे येथील संपादक गणेश मोकाशे,व सा.घोंगडीचे संपादक बंडु खांडेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे.तर माजलगाव भुषण पुरस्कार माजी नगरसेवक तालेब चाऊस (सामाजिक कार्य),श्री सिद्धेश्वर अर्बनचे चेअरमन सुनील रुद्रवार (सहकार), न्युट्रीजॅग गुळ उद्योगाचे अध्यक्ष अंबादास रोकडे (उद्योग), डॉ. दिनकर मस्के (आरोग्य ),ड टि. एन.कोल्हे (विधीज्ञ), बाळासाहेब कदम (भुमी पुत्र),मालीपारगाव ग्रामपंचायतीचे सरपंच अजय शिंदे (आदर्श सरपंच),केसापुरी सज्जाचे तलाठी रामेश्वर थापडे (उत्कृष्ट तलाठी ),देपेगाव/सांडस चिंचोली ग्रामपंचायतीचे ग्राम पंचायत अधिकारी हानुमंत राऊत (उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी) यांना शेतकरी कामगार पक्षाचे माजी मंत्री स्व लोकनेते गणपतराव देशमुख यांचे नातु पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख व बीड लोकसभेचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्याला आ.प्रकाश सोळंके, अयुष्यमानभारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड, माजी आमदार मोहनराव सोळंके,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष मिलिंद आवाड, अंबा स.सा.कारखान्याचे व्हाईस चेअरमन रमेशराव आडसकर, छत्रपती स.सा.कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप, माजी नगराध्यक्ष साहाल चाऊस, उद्योजक माधव तात्या निर्मळ, लोकपत्रकार भागवत तावरे, राजासाहेब देशमुख, युवानेते बाबरी मुंडे आदींसह विविध मान्यवर उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाला माजलगाव तालुक्यातील व शहरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने संयोजक, पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे, वाजेद पठाण ,राजेभाऊ पाष्टे, नय्युम आत्तार,वसंत परसे यांनी केले आहे.

# धाकटी ब्रह्मगिरी श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण येथे प्रदक्षिणा सोहळा

## ५०,००० भाविक उपस्थित राहण्याची शक्यता



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील प्रसिद्ध अशा श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा पौष वद्य षट्तिला एकादशी दि.२५ जानेवारी २०२५ वार शनिवार रोजी संपन्न होत आहे. संस्थानचे महंत महाराष्ट्रातील एक नामांकित कीर्तनकार भागवताचार्य श्री ह.भ.प.प.पू. गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या कल्पक व आचारशुद्ध नेतृत्वामुळे हे संस्थान अल्प कालावधीत नावारुपाला आले आहे.यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थानचा फार मोठा विकास झाला आहे. गेल्या दहा वर्षांपासून या तीर्थक्षेत्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत ब्रह्मगिरी प्रदक्षिणा होत आहे. गत वर्षी ५०,००० पेक्षा अधिक भाविकांनी प्रदक्षिणा केली होती.बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील भाविक मोठ्या संख्येने प्रदक्षिणेत सहभागी होतात.

हिंदू धर्मात ब्रह्मगिरी प्रदक्षिणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.महाराष्ट्रात श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा केली जाते.येथेही भगवान त्र्यंबकेश्वरांचे भव्यदिव्य मंदिर महंत श्री डोंगरे महाराज यांनी बांधले आहे.येथे त्रेतायुगात महर्षी गौतम ऋषी यांनी तप केले आहे.हे तीर्थक्षेत्र धाकटी ब्रह्मगिरी म्हणून प्रसिद्धीस आले आहे.बीड जिल्ह्याचे श्रद्धास्थान श्री क्षेत्र नारायण गडाच्या परंपरेतील हे तीर्थक्षेत्र आहे.नारायणगडाचे महंत वै.ह.भ.प.गु.माणिक बाबा यांना येथे गौतम ऋषींचा साक्षात्कार झाला.पुढे महंत वै.ह.भ.प.पू.गु.महादेव महाराज यांनी या संस्थानचा विकास करण्याचा संकल्प केला नंतर श्री क्षेत्र नारायण गडाचे विद्यमान महंत श्री ह.भ.प.प.पू.गुरुवर्य शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आता मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू आहे. प्रदक्षिणेच्या दिवशी पंचक्रोशीतील अनेक गावांतून भव्यदिव्य दिंड्या सहभागी होतात.मराठवाड्यातील सर्व भाविकांनी प्रदक्षिणा सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थानचे महंत श्री ह.भ.प.गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांनी केले आहे.

# ज्युनियर साईन्टिस्ट स्पर्धा परीक्षा

**बीड । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त निलज्योती सेवाभावी संस्थेतर्फे इयत्ता दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्युनियर साईन्टिस्ट ही स्पर्धा परीक्षा जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये संस्थेचे सचिव डॉ. नंदकुमार उघाडे यांनी आयोजित केली . ही परीक्षा सरस्वती विद्यामंदिर बीड , श्री माऊली इंग्लिश स्कूल सांडरवन , जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूल घाटजवळा ता. जि. बीड या शाळांमध्ये एकाच वेळी घेण्यात आली. या परीक्षेसाठी दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांचे तीन गट पाडण्यात आले होते. तिन्ही गटातून प्रथम द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात येणार आहे.

# घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार मोठया शिताफीने स्थानिक गुन्हे शाखेने पकडला: पाच घरफोडया केल्याचे उघड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



अंबाजोगाई उपविभागातील दाखल होणाऱ्या चोऱ्या, घरफोडयाचा संमातर तपास करुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हयातील गेला माल हस्तगत करणे बाबत आदेश वरीष्टांनी दिल्याने गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती काढुन कुख्यात सराईत दरोडेखोर हा त्याने चोरलेले सोने विकण्यासाठी परळी मध्ये येत असल्याची माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सापळा रचुन मोठया शिताफीने कुख्यात दरोडेखोर मोहन दौलत मुंडे, रा.क्रांती नगर, अंबाजोगाई यास अशोक नगर कमानीजवळ झडप मारुन पकडले. त्याचे जवळ विकण्यासाठी आनलेले सोन्याचे दागीणे आढळुन आले त्यास परळी व अंबाजोगाई येथे झालेल्या घरफोडी बाबत चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांने ०५ घरफोडया केल्याचे प्राथमिक चौकशीअंती निष्पन्न झाले असुन त्यांनी पाच दिवसा घरफोडया केल्याचे कबुल केले आहे, त्याचे ताब्यातुन पोलीस ठाणे परळी ग्रामीणचे ०२ गुन्हे, पोलीस ठाणे परळी शहर ०१ गुन्हा, पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण ०१ व पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर ०१ असे असुन ०५ दिवसा घरफोडीचे गुन्हे उघडकीस आनले आहे. त्याचे ताब्यातुन एकुण १२२ ग्रॅम सोने जवळपास आजचे बाजारभाव ९,००,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आला आहे. सदरील आरोपी हा दारु पिण्याचे व जुगार खेळण्याचे सवईचा असुन तो दारुच्या नशेत बंद घर पाहुन कुलुप तोडुन आत मध्ये प्रवेश करुन सोने, नगदी चोरुन नेतो व मिळालेल्या पैशातुन दारु पितो व जुगार खेळतो. आरोपी मोहन दौलत मुंडे याचेवर दिवसा घरफोडीचे अनेक गुन्हे दाखल आहेत.तो पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. सदरील कारवाई हि श्री नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, बाळकृष्ण जायभाय, विकास राठोड, राजु पठाण, नितीन वडमारे, सचिन आंधळे, तुषार गायकवाड, विकी सुरवसे, देविदास जमदाडे यांनी केली आहे.

# आ.सुरेश धस यांचा आदेश, अन प्रशासन गावच्या पारावर

## शेतकऱ्यांकडून समाधान आणि आभार व्यक्त



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी,पाटोदा, शिरूर मतदार संघातील शेतकरी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिरे आयोजित करण्याच्या प्रशासनाला दमदार आमदार मा.सुरेश धस यांनी आदेश देताच आष्टी तालुक्यातील तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना दिलेल्या सुचनेनुसार पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेतील अपात्रते संबंधी असणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून गावोगावी नेमून दिलेल्या तारखांना गावच्या पारावर शिबीरे घेतली जात आहेत.

वधानसभा निवडणुकीमध्ये भरघोस मताधिक्य घेऊन निवडून आलेल्या आणि सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या आ.सुरेश धस यांनी मतदारसंघातील विकास कामासह प्रशासनातील सर्वसामान्याला येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी गावोगावी पारावर जाऊन सोडवाव्यात असे आदेश दिल्याने गावातील पारावर प्रशासनातील तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे व गटविकास अधिकारी सचिन सानप यांनी विशेष मदत शिबिरे घेऊन पी. एम. किसान लाभार्थ्यांची ई-केवायसी नसणे,लँड सिंडींग नसणे, लाभार्थी अनट्रेसेबल असणे व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता या कॅम्पच्या माध्यमातून अपात्रते संबंधित असणाऱ्या अडचणी सोडवल्या आहेत. आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघात प्रशासनामार्फत विशेष मदत शिबिरे दि.२० ते २४ जानेवारीपर्यंत राबवले जाणार असून या कालावधीत प्रशासन शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेत अपात्र व या संदर्भात असणाऱ्या अडचणीचे निरसन करण्याचे काम करत आहे. या मदत शिबिरात शेतकऱ्यांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद असून या अभिनव उपक्रमाचे शेतकऱ्यांकडून आमदार सुरेश धस यांनी गावोगावी आयोजित केलेल्या शिबिरांमध्ये समस्या सुटल्या बद्दल शेतकरी नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.आभार मानले जात आहेत. दिलेल्या कालावधीमध्ये नमो किसान योजनेअंतर्गत वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी या या ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिराचा लाभ घेण्याचे व आपल्या समस्या सोडण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. चिखली येथे सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे, शिवाजी आवारे, शांतीलाल घोलप, अंकुश आवारे, अंगत शिंदे यांच्यासह उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,प्रमुख पदाधिकारी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ या विशेष मदत शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित होत.

## जिल्हा कृतीदल बालविवाह बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा कृतीदल व बालविवाह बैठकीचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बालविवाहाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात बैठक संपन्न झाली. प्रस्ताविक करतांना जिल्हा महिला बालविकास अधिकारी म्हणाले की, बालविवाह करणारे आईवडील व नातेवाईक यांना २ वर्षाचा कारावास होऊ शकतो. बालविवाहाविषयी अधिनस्त यंत्रणेने कार्यशाळा, रॅली, विविध स्पर्धा, रांगोळी, चित्रकला यामधून जनजागृती करावी. बालसंरक्षण समित्या स्थापन कराव्यात, बालविवाहाचा लोगो प्रत्येक शासकीय पत्रावर ठेवावा, बालविवाह रोखण्यासाठी चाईल्ड लाईनची मदत घ्यावी. संबधित यंत्रणेने बालविवाह संदर्भातील माहितीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्याकडे वेळोवेळी सादर करावा. या बैठकीस जिल्हा परविक्षा अधिकारी मंगेश जाधव,चाईल्ड हेल्पलाईनच्या जिल्हा समन्वयक अश्विनी जगताप तसेच संबधित अधिकारी उपस्थित होते. वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बालविवाह (युनिसेफ) च्या सोनिया हंगे, यांनी दुरदृश्य प्रणालीव्दारे बालविवाहाविषयी करावयाच्या उपाययोजना व जानजागृती विषयी माहिती दिली.

## परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब, विद्यार्थी आणि शिक्षण व्यवस्थेवर दुष्परिणाम करतो: प्रा. सुधीर पोकळे

**वडवणी । प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने बारावी बोर्ड परीक्षेच्या शासनाच्या परिपत्रकानुसार परीक्षेतील गैर अवलंबनाचे दुष्परिणाम यावर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. सुधीर पोकळे बोलत असताना परीक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब करणे ही शिक्षण क्षेत्रातील एक गंभीर समस्या बनत चालली आहे. विद्यार्थी चांगले गुण मिळवण्यासाठी किंवा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी शॉर्टकटचा अवलंब करत आहेत. परंतु या प्रकारचे वर्तन त्यांच्यावर आणि एकूण शिक्षण व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम



करीत आहे. तसेच गैरमार्गाचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होत नाही. व प्रामाणिकपणाचा अभाव दिसतो. गुणाच्या आधारे गुणवत्ता ठरल्यामुळे गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्याची खरी गुणवत्ता लक्षात येत नाही. परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब हा तात्पुरता लाभ देतो, पण दीर्घकालीन परिणाम मात्र घातक असतात. शिक्षण व्यवस्थेने आणि पालकांनी यावर गंभीरतेने लक्ष देऊन विद्यार्थ्यांना प्रामाणिकतेचे महत्त्व पटवून देण्याची गरज आहे. असे मौलिक विचार मांडले. एच एस सी बोर्ड परीक्षेच्या कॉपीमुक्त अभियानाची सुरुवात प्राचार्य डॉ. के. एम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नागनाथ साळुंखे तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोपीचंद घायतिडक यांनी केले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. जी कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. गोपाळ मस्के यांनी केले. कार्यक्रमास बारावी कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकनायक पुरस्कार

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील प्रसिद्ध साप्ताहिक गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा मुकुनायक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. संपादक ज्ञानेश्वर लंगे यांनी अल्पावधीत गदर साप्तहिकाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना हात घालून आपल्या वर्तमानपत्रात आवाज उठवला. जनतेच्या मनामध्ये गदर साप्ताहिकाने अल्पावधीत नाव कमावल आहे. या साप्ताहिकाच्या कामाची दखल घेऊन माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाने



संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकुनायक पुरस्कार जाहीर केला आहे. पुढील महिन्यात मान्यवरांच्या हस्ते मुकनायक पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे अशी माहिती माजलगाव निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, यांनी दिली.

## चंपावती महोत्सव ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत सर्व शाळांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे: जगताप, मुळूक, गलधर

### उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना महोत्सवाचे निमंत्रण!



**महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये दि ०१फेब्रुवारी २०२५ ते दि. ९ फेब्रुवारी २०२५ यादरम्यान संपन्न होणार असलेल्या जिल्हास्तरीय 'चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक' स्पर्धेचे निमंत्रण उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्याबरोबरच सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट साहेब, जलसंधारण मंत्री संजयजी राठोड साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्निल भैय्या गलधर यांनी भेटून निमंत्रण दिले व बालकलाकारांना प्रोत्साहन देण्याकरिता उपस्थित राहावे अशी विनंती केली.**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षीच्या अफाट यशानंतर जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत यावर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. ही ओळख भविष्यात अबाधित राखण्यासाठी साहजिकच नवं कलाकारांची पिढी समृद्ध होणं गरजेचे आहे. बालकलाकारांच्या अर्थातच शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देण्याकरीता त्यांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा या उदात्त हेतूने गतवर्षी याहिवर्षी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असून बीड जिल्ह्यातील मराठी/ इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे असे कळकळीचे अहवान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी केले आहे.

## निवडणूक निर्णय अधिकारी नामतालिका तयार करणेबाबत

**बीड । प्रतिनिधी**

ई वर्गातील संस्था म्हणजेच २५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सभासद असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी दिनांक २० जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका पॅनल तयार करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज १ शासकीय विभागातील (सहकार विभागातील कार्यरत अधिकारी,कर्मचारी वगळून) स्थानिक स्वराज्य संस्थेतील, सहकारी संस्थेतील कार्य कायम कार्यरत अधिकारी, कर्मचारी (वरिष्ठ लिपिक किंवा त्यापेक्षा जादा दर्जा असलेल्या कर्मचारी ) प्रमाणित लेखापरीक्षक, वकील ( पाच वर्षाचा कामाचा अनुभव) शासकीय सेवेतून,स्थानिक स्वराज्य संस्थेतून सेवानिवृत्त झालेला अधिकारी, कर्मचारी (वयाचे ६५ वर्षे पेक्षा जास्त नसलेल्या) यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहे.

## बनावट चलनी नोटांमध्ये मनिष क्षीरसागर यास अटक

### आठवले गँगचा सहभाग निश्चित

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलिसांची कामगीरी आठवले गँग सोबत सावलीसारखा राहणारा मनीष क्षिरसागर यांच्या घरामध्ये तीन महिन्यापूर्वी बनावट चलनी नोटांचा कारखाना मिळून आला होता. यामध्ये बीड शहर पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत यातील प्रिंटर, बनावट चलनी नोटा, आणि सहभागी प्रमुख आरोपी तात्काळ अटक केली होते. परंतु यातील प्रमुख आरोपी मनिष क्षीरसागर हा पोलिसांना तेव्हापासून गुंगारा देत होता. परंतु बार्शी नाक्यावरील डोंगरे कुटुंबावरील खुनी हल्ल्यामध्ये पुन्हा मनीष क्षीरसागर याचा सहभाग निश्चित झाला आणि स्थानिक गुन्हे शाखेने त्याला पुणे येथून उचलले.



परंतु पुणे येथे अशा प्रकारच्या बनावट चलनी नोटांमध्ये सहभागी असलेल्या मनीष क्षीरसागर याच्यासोबत अक्षय आठवले आणि ओंकार सवाई हे सुद्धा सोबत मिळून आले होते. तेव्हाच बीड शहर पोलिसांनी बनावट चलनी नोटांच्या गुन्हे तपासा संदर्भात सावध होऊन त्या दिशेने तपास करण्यात सुरुवात केली होती.

यावरून आयत्या तावडीत सापडलेल्या मणिष क्षीरसागर याचा कोर्टामार्फत बीड शहर पोलिसांनी जेलमधून त्यांचा ताबा घेतला. पोलिसांच्या तावडीत सापडल्यावर मनीष क्षीरसागर याने पोलिसांना सर्व माहिती दिली. अक्षय आठवले यांनी बनावट चलनी नोटा चलनात आणण्यासाठी पुणे येथे असलेल्या प्रविण गायकवाड यास पिस्टल पुरवले होते. तसेच पळून जाताना मनीष क्षीरसागर याला सोबत घेऊन जाऊन औरंगाबाद येथे लपवले होते. तसेच सनी आठवले यांनी सुद्धा यातील आरोपींना शरण देऊन अक्षय आठवले मार्फत संरक्षण पुरवले होते. या काका पोलिसांना गुन्ह्यात वापरलेला मनीष क्षीरसागर याचा मोबाईल मिळाला आहे. या माध्यमातून आणखी पुरावे या गँगच्या विरुद्ध पोलिसांना मिळणार आहे.

### ठेवीदारांचा न्यायदेवता म्हणून पालकमंत्री अजितदादा तुम्हीच मैदानात या !

## पिग्मी प्रतिनिधीला अश्रू अनावर

**गेवराई । प्रतिनिधी**

खाजगी पतसंस्था मल्टीस्टेट निधी अर्बन बँकेचे घोटाळे आणि त्यात ठेवीदारांचे पैसे अडकण्याचे प्रकार काही केल्या थांबत नाहीत. गेल्या वर्षभरात गेवराई शहरातील शेकडो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. आता यात आणखी बँकाची भर पडत चालली आहे.शहरातील खाजगी पतसंस्थेत व बँकेत गेल्या सहा महिन्यांपासून ठेवीदार पैशांसाठी सातत्याने चकरा मारत आहेत. मात्र, बँक अधिकारी काही दिवसांतच पैसे मिळतील, अशी आशा दाखवत सहा महिन्यांपासून ठेवीदारांना माघारी पाठवत आहेत. चेअरमन महोदय सांगतात की तुमच्या तातडीच्या गरजा भागवण्यासाठी खासगी सावकाराकडून कर्ज काढा, असा अजब सल्ला बँकेचे चेअरमन ठेवीदारांना देत आहेत. या बँकेत मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी आणि सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याची तडजोड म्हणून अनेकांनी ठेवी जमा केल्या होत्या. मात्र, मागील सहा महिन्यांपासून या बँकेतून पैसे विड्रॉल करणे बंद आहे. ठेवीदारांना केवळ तारीख पे तारीख देणे सुरू आहे. त्यानंतर शहरातील पिग्मी प्रतिनिधी म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याला खूप मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे खातेदारांचे पैसे वेळेवर न मिळत असल्यामुळे आर्थिक अडचणी येत आहेत त्यामुळे बँकेत पिग्मी प्रतिनिधी या नात्याने पाठपुरावा करून सुद्धा रक्कम मिळत नसल्यामुळे पिग्मी खातेदार थेट पिग्मी प्रतिनिधीत्व करणाऱ्यांना आमचे पैसे द्या आम्ही तुमच्याकडे पाहून भरले आम्हाला सांगू नका स्वतःचे घर विका पण आमचे पैसे द्या असे खातेदार पिग्मी प्रतिनिधी यांच्या दारात येऊन बोलतात मात्र बँकेत काम करणाऱ्या पिग्मी प्रतिनिधी यांनी नेमके करायचे तरी काय असा प्रश्न उपस्थित होत आहे एका पिग्मी प्रतिनिधी यांनी संबंधित चेअरमन यांना विनंती अर्ज सादर केला असता त्यांनी तो स्वीकारला नाही आणि खातेदारांचे पैसे देणार की नाही हेही सांगितले नाही हक्काचे पैसे मागायला जाणाऱ्या खातेदारांना मनमानी करणारे चेअरमन महोदयांनी तुम्ही जर काही केले तर आम्ही तुमचे पैसे देणार नाहीत अशा भूमिकेत धमकी देतात म्हणून उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तुमच्या रूपाने कर्तव्यदक्ष बीड जिल्ह्याला पालकमंत्री मिळाला आहे म्हणून पोटासाठी काम करणाऱ्या सर्व पिग्मी प्रतिनिधींना व खाजगी बँकेत पैसे ठेवणाऱ्या ठेवीदारांना तुम्हीच न्याय मिळवून द्याल ही अपेक्षा गेवराईकरांची आहे.

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम: शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यामध्ये विवीध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येत आहे आसे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सांगितले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिक त्यांना मानवंदना करतील व यानंतर

• वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक



बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार भगिनींना साडी वाटप, विविध प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

• उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर व शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे यांच्या आयोजित शिरूर येथे रांगोळी स्पर्धा व गोरगरीब महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेऊन साड्या वाटप करण्यात येणार आहेत.

• पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक तात्या पवार यांच्या आयोजित तालुका पाटोदा आंबेवाडी व हांडेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये सकाळी अकरा वाजता शालेय साहित्य वाटप होणार आहे.

• आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजित आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना सकाळी ११:३० वाजता अल्पउपहार देण्यात येणार आहे.

• युवासेना माजलगाव जिल्हा युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजित माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना सकाळी ११ वाजता फळ वाटप.

• धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ यांच्या आयोजित धारूर येथील शासकीय रुग्णालयात सकाळी ११:३० वाजता रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आहे.

• युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजित वडवणी मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही पेन वाटप करण्यात येणार आहे.

• शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांच्या आयोजित बीड.



# 26 जाने रोजी बालझुंबड-2025 च्या विजयी स्पर्धकांचा पारितोषिक वितरण सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग पंचविसाव्या बालझुंबड , स्नेह मिलन तथा उत्सव विद्यार्थ्यांचा -२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे हे पंचविसावे वर्ष असल्याने या स्पर्धेचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या स्नेहमिलन उत्सवात अंबाजोगाई तालुक्यातील अनेक शाळा व शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले




होते. दिनांक ३ जानेवारी ते ८ जाने २०२५ या दरम्यान रौप्य महोत्सवी बालझुंबडचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना एक व्यासपीठ मिळून त्यांना चालना मिळाली . प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी व सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी व संचालक संकेत मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली हा विद्यार्थ्यांचा स्नेहमीलन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यातील विजेत्या व गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा रविवार दि २६ जानेवारी २०२५ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी चार वाजता संपन्न होणार आहे. तेव्हा तालुक्यातील सर्व विजेत्या शाळा व विजेत्या विद्यार्थ्यांनी या गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. मागील २४ वर्षापासून बालझुंबड हा उपक्रम अंबाजोगाई शहरात अखंडीतपणे राबविण्यात येत आहे . प्रतिवर्षी तालुक्यातील सर्व शाळां या उपक्रमात उत्स्फूर्त प्रतिसाद देत असतात. याहीवर्षी तालुक्यातील अनेक शाळा यामध्ये सहभागी झाल्या होत्या. बालझुंबड हा उपक्रम तालुका स्तरावर आयोजीत केला असल्यामुळे त्यासाठी आवश्यक ते नियोजन देखील अतिशय उत्तम रित्या मंडळाच्या वतीने केले होते. बालझुंबड या उपक्रमांतर्गत इ.१ ली ते ४ थी या गटासाठी रंगभरण स्पर्धा, वैयत्तीक नृत्य, समुह नृत्य, इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी पी.पी.टी. स्पर्धा (PPT Competation), प्रश्नमंजुषा स्पर्धा (Quiz Competation), चित्रकला, वैयत्तीक नृत्य, समुहनृत्य स्पर्धा व विज्ञान शोध स्पर्धा (Science Search Competation ) आयोजित करण्यात आलेल्या होत्या. अंबाजोगाई तालुक्यातील जवळपास ७० ते ८० शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळांच्या माध्यमातून उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला होता. बालझुंबड या उपक्रमाच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक गुणी कलावंत तयार झाले असून ते नाटक, सिनेमा तसेच क्रीडा क्षेत्राद्वारे आपली छाप अवघ्या महाराष्ट्राभर उमटवत आहेत.




**गेवराई : येथील चिंतेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. मसाननाथ महाराज यांच्या शुभ हस्ते बुधवार दि. २२ जानेवारी रोजी साप्ताहिक श्रेयसराज दिनदर्शिका चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी संपादक शिवनाथ काळे सह इतर दिसत आहेत.**

## के.एस.पी विद्यालया येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि.२३/०१/२०२५ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के. एस.पी विद्यालयामधील नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलांनी मनोगत सादर केली. सुभाष बोस यांचा जन्म ओरिसातील एका मोठ्या बंगाली कुटुंबात झाला होता. भारतीय नागरी सेवा परीक्षा देण्यासाठी



त्यांना इंग्लंडला पाठवण्यात आले. परीक्षेत ते यशस्वी झाले, परंतु राष्ट्रवाद हा उच्च दर्जाचा असल्याचे कारण देत त्यांनी अंतिम परीक्षा दिली नाही. महात्मा गांधी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी १९२१ मध्ये भारतात परत आले. त्याच्या जीवन व कार्या विषयी मुलांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत जयंती साजरी करण्यात आली.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबीराचा समारोप संपन्न

**सफेपूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक शिबीराचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के. तर प्रमुख पाहुणे म्हणून सफेपूर गावचे सरपंच



माधवराव आहेर व ग्रामपंचायत अधिकारी सय्यद शफीक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवातीला वृक्षलागवड करून नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा अभिवादन करण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अंकुश काळे यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

दि. २५ जानेवारी रोजी 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्यात येणार असून त्याअनुषंगाने १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवतरुण मतदारांचा मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश असून राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून या दिवशी सर्व मतदारांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते. दि. २५ जानेवारी रोजी शनिवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे २४ जानेवारी रोजी शपथ घेण्याचे आवाहन केले आहे.

## पशुसंवर्धन विभाग प्रगणक यानां पशुसंवर्धन विषयक माहिती देण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार २५ नोव्हेंबर २०२४ हा संदर्भ दिवस धरुन पशुधन, कुक्कुट व कुक्कुटादी पक्षी व पशुधन क्षेत्रासाठी वापरली जाणारी उपकरणे यांची २१ वी पंचवार्षिक गणना २०२४ मध्ये घेण्याचे आयोजन केले आहे. पशुगणनेचा कालावधी २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ हा असून जिल्हयातील नागरी व ग्रामीण क्षेत्र निहाय कुटुंब, कौटुंबिक उपक्रम आणि संस्था यांच्याकडे असलेल्या जिल्हयात आढळणा-या पशुधन प्रजाती व कुक्कुटादी पक्षी यांची जाती, वयोगट व लिंग निहाय तसेच उपयोगानुसार आकडेवारी गोळा केली जाणार आहे. सदर पशुगणना बीड जिल्हयातील सर्व तालुक्यामध्ये करण्यात येत असून त्यासाठी ग्रामीण भागातील एकूण १३८५ गावांसाठी व शहरी भागासाठी १७८ वार्ड असे एकूण १५६३ गावांसाठी २१९ प्रगणक व ४८ पर्यवेक्षकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. आपल्याकडे येणा-या पशुसंवर्धन विभाग प्रगणक यांना पशुसंवर्धन विषयक योग्य ती माहिती देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

## संत हे ज्याच्या चित्ताचा विषय देव झाला अशाची संगती मागतात : ह भ प मोहन महाराज खरमाटे

**बीड । प्रतिनिधी**

मानवी जीवनात दु:खात्मक बद्धता जाण्यासाठी चांगली संगती आवश्यक आहे. कुसंगती केल्यास जीवन वाईटच बनेल. सत्संगती केल्याने जीवन सार्थकी लागते. संत जीवनात भगवंताचे अखंड नामस्मरण असते, त्यांचा विषय देव झालेला असून जीवन सार्थक झालेले असते. म्हणूनच संत हे ज्यांच्या चित्ताचा विषय देव झाला आहे अशाची संगती मागतात असे प्रतिपादन ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे खोकरम



ोहकर यांनी संत वामनभाऊ, संत भगवान बाबा, संत तुकाराम महाराज मंदिर इंद्रप्रस्थ कॉलनी येथे आयोजित किर्तन सेवेमध्ये सांगितले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र सानप याच्या नियोजनातुन गेल्या१३वर्षापासुनश्रीसंत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते या निमित्त यावर्षी वैराग्यमुर्ती वे.श्री संत वामन भाऊ श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कीर्तनात निरुपसाठी देव वसे चित्ती/ त्याची घडावी संगती //१// या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांनी संत संगतीचे फायदे सांगितले.

## तक्रार समिती बंधनकारक अन्यथा कार्यालयास ५० हजारांचा दंड

**बीड । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बीड जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी क्षेत्रातील ज्या आस्थापनांमध्ये १० किवा त्यापेक्षा अधिक अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश असेल अशा सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी सहकारी, महामंडळांनी कामाच्या ठिकाणी महिला तक्रार निवारण समिती दि. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत गठीत करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी फारुक शेख यांनी केले आहे. समिती गठीत झाल्यानंतर समितीच्या अध्यक्ष, सदस्यांची नावे पदनाम व संपर्क क्रमांकाचा फलक दर्शनी भागात लावण्यात यावा. समिती गठीत केल्याबाबतचे आदेश जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बाबुराव वाघ हाईटस, नाट्यगृह रोड, बीड येथे सादर करावेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये सर्वेक्षण करण्यात येणार असून, या सर्वेक्षणावेळी संबंधित आस्थापनेत तक्रार निवारण समिती गठीत न केल्याचे निर्दशनास आल्यास कायदयानुसार ५० हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रॅली, मुख्य कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाव्दारे निर्देशित पंधरावा राष्ट्रीय मतदार दिन दि. २५ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणसाठी दि. २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय मतदार दिनाचा मुख्य कार्यक्रम आहे.

## आनंदनगरीची धमाल, सुवासिनींचा मेळा पालक व विद्यार्थ्यांनी गजबजली शाळा : दिंद्रुडच्या जि.प.शाळेचा अभिनव उपक्रम

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या- मुलांची) शाळेतील प्रांगणात आनंदनगरीची धमाल अनुभवायला मिळाली. तर हळदीकुंकवाच्या निमित्ताने सुवासिनींचा मेळा भरल्याने शाळा अक्षरशः गजबजून गेली होती. मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल मांडून आनंद साजरा केला तर गावातील सुवासिनींनी एकमेकींना तिळगूळ वाटत हळदीकुंकवासह वह्या व



पेनांचे वाण वाटले. सदरील अभिनव उपक्रम गुरुवार रोजी पार पडला. राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी सरपंच अजय कोमटवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रकाश काशीद, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, केंद्रीय मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, मंचक सोळंके, मनोहर कटारे, शालेय समिती अध्यक्ष दादासाहेब वकरे, उपाध्यक्ष अंगद तांबे, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पत्रकार गणेश काटकर, युवानेते बाबा कांबळे आदिंची उपस्थिती होती. शाळेतील पहिली ते सातवीच्या मुला-मुलींनी ६९ दुकाने थाटली होती. ज्यात ५५ हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. शाळेच्या सहशिक्षिका प्रगती देशपांडे, मीरा फपाळ, राधिका गडदे, सारिका फुलमाळी, सारिका कटारे, डोंगरे यांनी उत्कृष्ट नियोजन केले.



*राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज महाराष्ट्र राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सन २०२५ - २६ च्या अर्थसंकल्पीय मागण्यांच्या अनुषंगाने बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये अर्थसंकल्पीय मागण्यांच्या अनुषंगाने तसेच विभागातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तयार करण्यात येत असलेल्या रोडमॅपचे विभागाच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. या बैठकीस अर्थ व नियोजन तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.*

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश-४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ३०/२०२५**

अर्जदार- मिना भ्र. प्रविण तांदळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आंबिलवडगांव. ता. जि.बीड

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

अर्जदारातर्फे वकिल- ॲड. एस.बी.खाडे, बीड

मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता भाडेपटटा करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार मिना भ्र. प्रविण तांदळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आबिलवडगांव, ता. जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा शिक्षण याची सख्खी आई असुन अज्ञानाची नामे आदित्य पि. प्रविण तांदळे, वय ०७ वर्षे, धंदा पालनकर्ती आहे. अज्ञानाचे नावे असलेले मौजे अंबिलवडगांव हाददीतील गट नं. ३३७ मधिल क्षेत्रफळ ०-८० हे. आर. अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत भाडेपटटा करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल

आज दिनांक २०/ ०१ / २०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **प्रकरणातील पुढील तारीख : २५/०२/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. माने साहेब सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०३८/२०२४,**

CNR No. MHBI0200019962024

**धनंजय पि. दत्तात्रय पवार व २ इतर वि. निरंक, (मार्फत - ॲड. वाय. आर. शेळके)**

अर्जदार - १. धनंजय पि. दत्तात्रय पवार, वय-५३ वर्ष, धंदा-शेती, रा. विद्यानगर, बीड ता. जि. बीड २. श्रीमती रूपाली भ्र. विनोद पवार, वय-४१ वर्ष, धंदा-घरकार, रा. कालिका नगर, नगर रोड बीड ता. जि. बीड, ३. कौस्तुभ पि. विनोद पवार, वय-२० वर्ष, धंदा-शिक्षण, रा. सदर

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत **राजुबाई भ्र. दत्तात्रय पवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **राजुबाई भ्र. दत्तात्रय पवार** यांचा मृत्यु दिनांक १७/०२/२०१८ रोजी जिल्हा रूग्णालय बीड ता.जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क. २ हि मयताच्या मयत मुलाची पत्नी आहे. व अर्जदार क. ३ हा नातु आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत राजुबाई भ्र. दत्तात्रय पवार यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख २३/०८/२०२४,** आज दिनांक २० माहे जुलै २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्या माजलगावच्या छत्रपती सहकारी साखर कारखान्यास तांत्रिक कार्यक्षमता पुरस्काराणे गौरव

**शरदचंद्रजी पवार, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण**

**माजलगाव । प्रतिनिधी**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे मार्फत दिला जाणारा २०२३-२४ यावर्षीचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर पूर्व विभाग )द्वितीय पारितोषिक छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड यांना मा.शरदचंद्रजी पवार व मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते देण्यात आला. हा पुरस्कार कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप व कार्यकारी संचालक, शेतकी अधिकारी, सचिव, चीफ



इंजिनिअर, चीफ अकाऊंटंट यांनी स्वीकारला. पुणे येथे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांच्यावतीने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कारखान्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. मागील २०२३-२४ या वर्षाच्या तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार छत्रपती कारखान्याच्या कार्यक्षमता मधील उसाचा तंतुमय निर्देशांक ८४.१०%, रिड्यूस्ड मिल एक्सट्रॅक्शन ९५.६५ , प्रायमरी एक्स्ट्रक्शन ७३.३०%, बगॅस बचत ११.५१%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा वापर ४०.६०%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या विजेचा वापर २६.४० किलो वॅट प्रति टन ऊस, गाळप क्षमतेचा वापर ११२.४७%, देखभाल दुरुस्तीसाठी एकूण खर्च रुपये ११५ प्रति टन ऊस, गाळपाचे बंद कालावधीचे प्रमाण १.०७% बगॅस मधून व्येय होणाऱ्या साखरेचे प्रमाण ०.५६% मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या मध्ये घट ०.४८१% असे कार्यक्षमता वैशिष्ट्य कारखान्याने केलेली असून यामुळे छत्रपती कारखान्यास मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन कारखान्यास गौरविण्यात आले या पुरस्कारासाठी सर्व स्तरातून चेअरमन बाजीराव जगताप,व्हा. चेअरमन मोहनराव जगताप तसेच कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

दैनिक मराठवाडा पत्र | मराठवाडा विशेष | शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५ | पान ६

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

## शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख , वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या मार्गदर्शनाखाली विवीध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली.



शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांना अभिवादन केले. बीड जिल्हा रुग्णालय येथे सर्व रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार भगिनींना साडी वाटप,प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजना खाली आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना अल्पउपहार देण्यात आला.

युवासेना माजलगाव तालुका युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजना खाली माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. धारूर तालुकाप्रमुख बाबा सराफ यांच्या आयोजना खाली धारूर येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आले. युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजनाखाली वडवणी तालुका मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही,पेन वाटप करण्यात आले.

---

# नियंत्रण सुटलेल्या टेम्पोने आराधी महिलेस चिरडले

## अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवी मंदिर परिसरातील दुर्घटना

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील श्री योगेश्वरी देवी मंदिराच्या मुकुंदराज रोडवरील प्रवेशद्वाराजवळ बसलेल्या आराधी महिलेचा टेम्पोने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाला. हि घटना बुधवारी (दि.२२) दुपारी घडली. केसरबाई धोंडीराम जोगदंड (वय ६५, रा. परळी वेस, समता नगर, अंबाजोगाई) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केसरबाई बुधवारी दुपारी श्री योगेश्वरी देवी मंदिराच्या मुकुंदराज रोडवरील प्रवेशद्वाराजवळ बसल्या होत्या. यावेळी मंदिर परिसरात झालेल्या कार्यक्रमाच्या खुर्च्या व इतर साहित्य नेण्यासाठी टेम्पो (एमएच २८ बीबी ३२२७) आला होता. सामान भरून गेटच्या बाहेर जात असताना चालकाचे टेंपोवरील नियंत्रण सुटले व टेम्पो थेट केसरबाई जोगदंड यांच्या अंगावरून जाऊन भिंतीला धडकला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या केसरबाई जोगदंड यांचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने टेम्पो तिथेच सोडून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. पुढील तपास शहर पोलीस करत आहेत.



---

# बीडनजीक होणारा उड्डाणपूल ३ पदरीऐवजी ६ पदरी होणार

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनंतर पालकमंत्री ना.अजितदादा पवार, धनंजय मुंडेंकडून मोठा बदल

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर- छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या निविदा विभागाने काढल्या होत्या. परंतु त्यामध्ये आता मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विभागाला निर्देश दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून या कामी पाठपुरावा सुरु केला आहे.

### भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन नवा बदल

**भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मांडलेली सूचना कौतुकास्पद आहे. या सुचनेची दखल घेऊन राज्य शासनाने योग्य ती पाऊले उचलण्यास सुरुवात देखील केली आहे. या कामाबद्दल अजितदादा पवार, धनंजय मुंडे यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.**

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल तयार केला तर हे अपघात टाळता येतील, असा प्रस्ताव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे गतवर्षी दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर इतर प्रक्रिया पूर्ण होऊन निविदाही निघाल्या होत्या. परंतु हे उड्डाणपुलाचे काम ३ पदरी होणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.



---

# क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ वा वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय समारंभ रविवार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी पोलिस मुख्यालय मैदानावर क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सकाळी ९ वाजून १५ मिनिटानी ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण समारंभ होत आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता संपन्न होणार आहे. दोन्ही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.३० वाजेपूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे.

---

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी प्रविंत गायकवाड, उपाध्यक्षपदी अरुण कांबळे, सचिवपदी नवनाथ लोंढे, सहसचिवपदी राहुल वाल्हेकर यांची निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव २०२५ साजरा करण्यासाठी भिमनगर मधील संकल्प बुद्ध विहारात आष्टी येथील सर्व भिम प्रेमी यांची मंगळवार दि २१ जानेवारी रोजी बैठक घेण्यात आली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ युवराज तुपारे यांच्या अध्यक्षतेखाली जयंती समिती स्थापन करण्यात आली.यावेळी सर्वानुमते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी प्रविंत गायकवाड यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी माधव कांबळे यांची तर सचिवपदी नवनाथ लोंढे, सहसचिवपदी राहुल वाल्हेकर, कोषाध्यक्षपदी सिताराम घोडके यांची निवड करण्यात आली.या बैठकीला नगरसेवक अरूण निकाळजे, माजी नगरसेवक दिपक निकाळजे, राजु निकाळजे,रूपेश निकाळजे, मिलिंद निकाळजे, शशिकांत निकाळजे, सादिक कुरेशी, ॲड प्रबोधन निकाळजे, ॲड राजाभाऊ निकाळजे, यांच्यासह यावेळी सर्व भिम प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



---

# सोळंके साखर कारखान्याकडून ऊस बीलाची रक्कम बॅक खात्यात वर्ग: चेअरमन विरेंद्र सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या चार जानेवारी अखेर ऊस बीलाची रक्कम बॅक खात्यात जमा केली असल्याची माहिती चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी दिली.



यासंदर्भात चेअरमन विरेंद्र दादा सोळंके म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग केली असुन, उर्वरित राहिलेली रक्कम ही निधी उपलब्धतेनुसार लवकरच संबंधित ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग करण्याचे कारखाना व्यवस्थानाचे नियोजित असल्याचे कारखान्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी नमूद करून कारखान्याचे मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके आणि सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने सातत्याने जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्यामुळे ऊस उत्पादकांनी कोणतीही शंका न बाळगता उद्दीष्ट पुर्तीसाठी आपला ऊस याच कारखान्यास गाळपास देऊन सहकार्य करावे. असे आवाहन ही चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी केले

---

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास साध्य होतो : तहसीलदार रुईकर

## सुंदराराव सोळंके महाविद्यालयाच्या रासेयो च्या शिबिराचे उद्घाटन

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिशा मिळते. शिबिराच्या माध्यमातून विविध कृतिशील उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साध्य होतो असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन करताना तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने लऊळ येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय विशेष वार्षिक निवासी शिबिर दि.२३ ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. शिबाराचे उद्घाटन तहसीलदार संतोष रुईकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे होते.



---

# शंभर टक्के अंधत्व असलेल्या रुग्णाची पत्रकार शेख हमीद यांच्या पुढाकाराणे झाले ऑपरेशन

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकसेवा संकल्प सा.प्रतिष्ठान चे संवस्थापक अध्यक्ष व दै.सूर्योदय वृतपत्राचे प्रतिनिधी शेख हमीद हे नेहमी समाज सेवा करण्या मधे आग्रेसर असतात व समाजसेवेत अग्रेसर असणारे दोन-चार दिवसापासून ते बीड जिल्हा रुग्णालय येथे आपल्या नातेवाईकाच्या उपचारासाठी चार ते पाच दिवस बीडला मुक्कामी राहत असताना. दिनांक २१/०१/२०२४ रोजी(४) नंबर वार्डमधे एका रुग्णाजवळ सहज़ बसुन त्यांना विचार पूस केली तर रुग्णाच्या नातेवाईकाने सांगितले की १)गौतम कल्याण गायकवाड रा.मादळमोही ता.गेवराई जी.बीड हे माझे भाऊ आहे त्यांच्या अवघड जागेवरच्या गाठिचे ऑपरेशनकरण्यासाठी आम्ही मादळमोही येथून बीड जिल्हा रुग्णालय येथे आले आणि विशेष म्हणजे ते १००%टक्के अंधत्व आहे.ऑपरेशन लवकरात लवकर होऊन आम्ही घरी जावे असे आम्हाला वाटते.





**तुळजापूर येथे कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी भाजपचे गट नेते आमदार प्रवीण भाऊ दरेकर दरेकर ताई , यश भैय्या दरेकर, आले होते या वेळी त्यांचा सत्कार करतांना गणेश शिराळे, एकनाथ कदम छायाचित्रात दिसत आहेत.**

---

# घरकुल योजनेचे नवीन अर्ज सुरू ; नागरिकांनी लाभ घ्यावा: भाजपा नेते नवनाथांना शिरोळे पाटील

**नरेंद्र भाई मोदी आणि देवेंद्र फडणवीस उर्फ देवा भाऊ फडणवीस यांनी अतिशय चांगल्या प्रकारे गोरगरीब लोकांना घरकुल मिळावे कोणीही वंचित राहू नये हा निर्णय भारतासह महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र सरकारने देखील घेतल्यामुळे सर्व तमाम भारतीयांमधून मोदी सरकारचे फडणवीस सरकारचे कौतुक होत आहे .**

**बीड । प्रतिनिधी**

घरकुल योजनेचे नवीन अर्ज सुरु.लंबवर्तुळाकार क्षेत्र निवडण्यासाठी ड्रॅग करा- १) अर्जदाराचे आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले), २) अर्जदार यांचे कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड (पती/पत्नी व मुले), ३) उत्पन्नाचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे), ४) जात प्रमाणपत्र ५) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले), ६) जागेचा पुरावे (पी. टी.आर, पी. आर. कार्ड, ७/१२ किंवा खरेदीखत), २) अर्जदार यांचे आई व वडिलांचे आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र), ८) पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम. विश्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत आवश्यक आहे.



प्रधानमंत्री आवास योजना २.० सुरुवात झाली असून, नगरपरिषद बीड हद्दीतील निकषात बसणाऱ्या नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे सभापती नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात बीड शहरातील तसेच बीड जिल्ह्यातील सर्व जनतेला आवाहन केले आहे. गरिबांचे घराचे स्वप्न साकार व्हावे या बाबीसाठी सरकारकडून ही योजना घरकुलाच्या संदर्भात दिल्ली सह आता महाराष्ट्र राज्यात देखील राबविण्यात येत आहे म्हणून भारताचे लोकप्रिय प्रधान सेवक तथा पंतप्रधान मा नरेंद्र जी भाई मोदी साहेब आणि महाराष्ट्राचे कुशल आणि सुसंस्कृत मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा भाऊ यांच्या उत्कृष्ट कार्याचे सर्व दिल्ली सह महाराष्ट्रातील तमाम नागरिकांमधून कौतुक होत आहे कारण की गोरगरीब लोकांना न्याय फक्त भारतीय जनता पार्टीचे सरकारच देऊ शकते असे देखील तमाम नागरिकांमधून सध्या चर्चा होत आहे आणि दिल्ली सह महाराष्ट्रातील सरकार व अतिशय जनता सध्या खुश आहे ते करत असलेल्या कामाच्या बाबतीत सर्व लाडक्या बहिणी मधून व तमाम भारतीयांमधून समाधान व आनंद व्यक्त होत आहे प्रधानमंत्री आवास योजनेचा शहरी २.० टप्पा सुरू आला आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी पात्रतेचे निकष बाप्रमाणे असून, भारतामध्ये अर्जदाराचे तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, अर्जदाराने मागील २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभघेतलेला नसावा.